# मेट्रो-३च्या पाचव्या बोगद्याचे काम पूर्ण

**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-२ येथील 'मेट्रो ३'च्या कामाने वेग घेतला आहे. या प्रकल्पातील पाचव्या बोगद्याचे काम पूर्ण झाले असून, आता मेट्रोच्या कामास वेग येण्याची शक्यता आहे. मुंबईमध्ये मागील एक ते दीड वर्षापासून मेट्रोच्या ३ मार्गांचे काम सुरू आहे. याआधी माहीम येथील बोगद्याचे काम पूर्ण झाले होते. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेचे काम जलदगतीने करण्यात येत आहे. यामध्ये सीप्झ व आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन ठिकाणी भुयारीकरणाचे (ब्रेक थ्रू) काम सुरू आहे. तर आता यातील पाचवा बोगदा पूर्ण झाल्याने या कामास वेग येणार आहे.